CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २ एप्रिल २०२५ | वर्ष : २३ वे | अंक : १८३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

**१४ वा सामना**

RCB Vs GUJARAT TITANS

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. गुजरात टायटन्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : बंगळुरू

**सोलापूर शहराचे तापमान**

कमाल तपमान ४०.१

किमान तपमान २६.०

## विनाशकाले विपरीत बुद्धी :

# आत्महत्याच! नवऱ्यानंतर अवघ्या ७२ तासांत बायकोने जीवन संपविले

# ठिकाण तेच, पॅटर्नदेखील तोच, दिवस अन् व्यक्ती मात्र नवी!!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**नवऱ्याच्या आत्महत्येनंतर तिसऱ्या दिवशी म्हणजे अवघ्या ७२ तासात बायकोने आत्महत्या केल्याची खळबळजक घटना सोलापुरातील भगवान नगर झोपडपट्टीत घडली आहे. व्यवसायाने पेंटर असलेल्या नवऱ्याने आत्महत्या करुन स्वत:ला संपविण्याचा अत्यंत टोकाचा निर्णय घेतला, अगदी तसाच निर्णय बायकोने घेऊन तिनेदेखील आत्महत्या करुन जगाचा निरोप घेतला. विनायक बाबूराव पवार (वय ३०) आणि पूजादेवी विनायक पवार (वय २५ रा. दोघेही रा. भगवान नगर झोपडपट्टी, सोलापूर) अशी आत्महत्या केलेल्या नवरा-बायकोची नावे आहेत. नवरा विनायक याने शनिवारी (ता.२९) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घराशेजारील पाण्याच्या टाकीला गळफास घेऊन स्वत:ला कायमचे संपविले होते. त्यानंतर बायको पूजादेवी हिने सोमवार (ता.३१) रात्री साडेअकरा वाजताच नवऱ्याने ज्या पाण्याच्या टाकीला गळफास घेतला, त्याच ठिकाणी बायको पूजादेवी हिने ओढणीने फास घेऊन या जगाचा निरोप घेतला.**

विशेषत्वे, पतीने स्वत:ला कायमचे संपविले. त्याच्या अगदी ७२ तास उलटण्याच्या आतच पत्नीनेदेखील स्वत:ला संपवण्याचा अत्यंत टोकाचा निर्णय घेतल्याचे समोर आलेल्या घटनेवरुन स्पष्ट होत आहे. नवरा बायकोच्या लागोपाठ आत्महत्या करण्याने सोलापुरात खळबळ माजली. आत्महत्या करुन आई-वडील कायमचे सोडून गेले, मात्र त्यांच्या पश्चात मुलगा आणि मुलगी अशा बिचारी दोघं पोरं मात्र कायमची वनवासी झाली. आयुष्यभरासाठी जन्मदात्या माता-पित्यापासून कायमची पोरकी झाली.याबद्दल भगवान नगर झोपडपट्टीसह सोलापुरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.जन्मास घातलेल्या त्या अभागी पोटच्या गोळ्यांना कायमचे सोडून जाण्याची एवढी निष्ठूर शिक्षा त्यांच्या आई-वडिलांनी का दिली? असा संतापजक सवालदेखील काही नागरिकांनी व्यक्त केला.

दरम्यान, जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी कपिल कांबळे हे दोन्ही घटनांचा तपास करींत आहेत.




**सोलापूर : जिवंतपणी आयुष्याच्या हिंदोळ्यावर आनंदी आणि समाधानी मुडमध्ये असताना विनायक आणि पूजादेवी या उभयतांनी चिमुरडा हर्ष आणि चिमुरडी माऊ यांच्यासमवेत काढलेला हा अप्रितम फोटो आता त्यांच्या नातेवाईकांसाठी केवळ आठवण म्हणूनच राहिलेला.**

### पोरके झालेल्या हर्ष अन् माऊ यांचा सांभाळ कोण करणार?

आई-वडिलांच्या आत्महत्येतून कायमचे पोरके झालेल्या साधारण ६ वर्षाच्या हर्षचा आणि अवघ्या तीन वर्षे वयाच्या माऊचा सांभाळ कोण करणार हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण मृत विनायक याचे आई-वडील वारलेले आहेत. ते असते तर हर्ष आणि माऊ या नातवंडांचा सांभाळ त्यांनी केला असता मात्र ते जगात नाहीत. मृत विनायक याला चार भाऊ आहेत. यापैकी एक भाऊ संमजस्य आहे, तो हर्ष आणि माऊ यांचा सांभाळ करेल, असे सांगण्यात आले.

- आई-वडील कायमचे सोडून गेले, बिचारी पोरं झाली कायमची वनवासी
- जन्मास घातलेल्या त्या अभागी पोटच्या गोळ्यांना एवढी निष्ठूर शिक्षा का?
- भगवान नगर झोपडपट्टीमधील आत्महत्येच्या खतरनाक घटनेनं समाजमन चिंतातूर

### हर्ष..माऊ... सॉरी बरं का? स्टेटस ठेऊन विनायकने संपविले स्वत:ला

मृत पत्नी पूजादेवी आणि पती विनायक यांच्यामध्ये सतत कलह आणि भांडणतंटे सुरु होते. घराचे रंगकाम करणाऱ्या पती विनायक याच्यावर पत्नी पूजादेवी सतत संशय घेत होती. संशयाच्या कारणावरुन दोघांमध्ये नेहमीच कटकटी होत होत्या. बायकोसोबच्या नेहमीच्या भांडणाला, तिचा कटकटीला, त्रासाला विनायक वैतागला होता. त्या वैतागण्यातून आणि आलेल्या नैराश्यातून त्याने व्हॉटस्अप् स्टेटस ठेवून आत्महत्या केली. आत्महत्यापूर्वी विनायक याने 'हर्ष ... माऊ... सॉरी बरं का!' हे स्टेटस ठेवले. स्टेटस्साठी वापरलेले हे शब्द खूप काही सांगून जातात. पोलीस सूत्रांकडून ही माहिती मिळाली.

### पप्पा, मम्मी मला दाखवा म्हणत चिमुरड्यांचा आर्त टाहो, नातेवाईकांना फुटतोय हुंदका, चिमुरड्यांना समजवायचं तरी कसं?

मृत विनायक आणि पूजादेवी यांची हर्ष आणि माऊ ही दोन्ही मुले लहान आहेत. त्यांना जगाची अद्याप नीट ओळखदेखील झालेली नाही. आई-वडील आपणास सोडून गेलेत, हे त्यांना समजत नाही. दरम्यान पप्पा, मम्मी आम्हाला दाखवा म्हणून दोघे चिमुरडे आर्त टाहो फोडताहेत. 'तुमचे आई-वडील गावाला गेलेत, येणार आहेत' असे सांगता सांगता नातेवाईकांचे अंतकरण भरुन येतेय. त्यांचा हुंदका फुटतोय. मम्मी, पप्पाबद्दल सतत विचारणाऱ्या त्या चिमुकल्यांना समजवायचे तरी कसे? हा प्रश्न नातेवाईकांपुढे आहे.

### माझ्यामुळे नवरा गेला..मी कशाला मागे राहू? घराला बाहेरुन कडी घालून तिने पुढे 'हे' केलं..

माझ्यामुळे माझा नवरा गेला, आत्ता मी कशाला मागे राहू, तो मला मागे राहू देणार नाही, अशी बडबड आत्महत्येपूर्वी सोमवारी दिवसभर मृत पूजादेवी करत होती, रात्री सगळे झोपल्यानंतर तिने घराला बाहेरुन कडी लावून घेऊन घराशेजारील पाण्याच्या टाकीला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे नातेवाईकांसह पोलीस सूत्रांनी सांगितले.

### पोटच्या लेकरांचा तरी विचार करायला हवा होता, दोघा नवरा-बायकोला चिमुरड्यांची कदर तरी काय?

नवरा बायकोमध्ये भांडणे होणे यात काही वेगळं असे काही नाही. भांडणे होत राहातात. मात्र भांडणे एवढी विकोपाला जायला नकोत. भांडणाचा कडेलोट मृत विनायक आणि पूजादेवी यांच्यामध्ये झाला. मात्र आत्महत्या करण्यापूर्वी विनायक याने हर्ष आणि माऊ या मुलांचा विचार करायला हवा होता. शिवाय आपल्यासह पोरांना सोडून त्यांचा बाप कायमचा निघून गेला, आता बापाच्या पश्चात पोरांना आपण तरी सांभाळू, असा पोक्त विचार मृत पूजादेवीने करायला हवा होता. जो अविचार विनायकने केला, त्यापेक्षाही अविचार पूजादेवीने केला. दोघांनही आपल्या पश्चात आपल्या काळजाच्या दोन तुकड्यांचे काय होणार? याचा जरासुद्धा पोक्त विचार केला नाही, एवढे हे दोघे अविचारी आणि पोटच्या गोळ्यांची कदर नसणारे होते, अशा प्रतिक्रिया त्यांच्या नातेवाईकांमधून व्यक्त केल्या जात आहेत.

## कुंभारगल्ली येथे गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : उत्तरसदर बझार परिसरातील कुंभार गल्लीत राहणाऱ्या राम श्रीमंत आळसुंदे (वय ५०) याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास उघडकिस आली. पहाटे दीड वाजेच्या सुमारास राम आळसुंदे याचा मृतदेह घरातील छताच्या लोखंडी अँगलला दोरींच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## मुलाच्या त्रासाला कंटाळून बापाची रेल्वेखाली आत्महत्या

**माढ्यातील लऊळ येथील घटना**




✔ **कुर्डुवाडी** : मुलाच्या रोजच्या त्रासाला कंटाळून वडिलांनी रेल्वे खाली उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना दि.३१ मार्च दुपारी ३.३० ते दि.१ एप्रिल रोजी सकाळी कुर्डूवाडी-पंढरपूर रेल्वे मार्गावरील लऊळ (ता. माढा) शिवारात घडली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात मुलगा निखिल बाळासाहेब पाटील यांनी फिर्याद दाखल केली आहे. बाळासाहेब पितांबर पाटील (रा.५६ सापटणे (भो.) ता. माढा) असे आत्महत्या केलेल्या वडिलांचे नाव आहे. याप्रकरणी सौरभ बाळासाहेब पाटील याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सौरभ बाळासाहेब पाटील हा मला काही जॉब नाही तरी मला काहीतरी उद्योग धंदा काढून द्या असे म्हणत वडील बाळासाहेब यांना वारंवार शिवीगाळ, मारहाण करत होता. त्याच्या नेहमीच्या त्रासाला कंटाळुन बाळासाहेब यांनी रेल्वेखाली आत्महात्या केली. त्यांचा थोरला मुलगा निखिल याने फिर्याद दिली आहे. सौरभ बाळासाहेब पाटील (वय २४ रा. सापटणे) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळासाहेब पाटील यांचा आत्महत्येपूर्वी धाकटा मुलगा सौरभसोबत मोबाईलवर संवाद सुरू होता. मी आत्महत्या करणार आहे असेही ते फोनवर त्याला सांगत होते. आणि अखेर त्यांनी रेल्वेखाली उडी घेऊन आत्महत्या केली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मागण्या लिहून घेतल्या होत्या का?

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 255-27-359 |
| संगम श्री नाईट | 467-76-349 |
| कल्याण | 460-04-356 |
| मुंबई | 190-07-449 |

## डोक्यावर आपटला तसा झाला 'तो' गार

### आळजापूरला कारण किरकोळच घडले, पण तरुण जिवानिशी गेला!



**मृत अमोल अगंद**

✔ **बार्शी** : बार्शी तालुक्यातील आळजापूर येथे क्षुल्लक कारणावरून झालेल्या मारहणीत एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवार (ता.३१) सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी पोलिस आरोपीला जोपर्यंत ताब्यात घेत नाहीत तोपर्यंत प्रेत ताब्यात घेणार नाही असा पवित्रा मृताच्या नातेवाईकांनी घेत संताप व्यक्त केला. पोलिसांनी समजूत काढल्यानंतर मृतदेह ताब्यात घेण्यात आला.

दरम्यान, झालेल्या मारहाणीमध्ये दोघा सख्या भावांपैकी अमोल अंगद (वय २७ रा. अळजापूर) या एका भावाचा मृत्यू झाला आहे, तर दुसरा भाऊ संजय अंगद गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर धाराशिवच्या सरकारी रुग्णालया उपचार सुरु आहेत.

संशियत आरोपी मयुर अनिल दराडे याने गैरसमज करून घेवून लाथाबुक्यांनी मारहाण करींत असताना संजय अंगद यांचा भाऊ अमोल अंगद हा सोडवण्यासाठी आला असता, त्यास मयुर दराडे याने जिवे मारण्याच्या उद्देशाने जोरात ढकलुन दिले. या दरम्यान त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत करून जिवे ठार मारले.

### निव्वळ गैरसमज झाला अन्...

यातील फिर्यादी हे गावातील व्यक्ती नाना गाडेकर यास 'चल येथून निघ' असे म्हणाले, असता ते संशयित आरोपी मयुर दराडे यास म्हणाले. असल्याचा गैरसमज करून घेवून फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत असताना फिर्यादीचा भाऊ अमोल अंगद हा सोडवण्यासाठी आला असता त्यास संशयित आरोपी दराडे याने तुला बघून घेतो, असे म्हणून जिवे मारण्याच्या उद्देशाने जोरात पाराच्या कठड्यावर ढकलून त्याच्या डोकीस गंभीर दुखापत करून जिवेठार मारले. त्यामुळे फिर्यादीची दराडे यांचे विरूध्द तक्रार आहे. असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

### उपचारापूर्वीच अमोल अंगद यांचा मृत्यू

फिर्यादीचे नातेवाईक घटनास्थळी आले. त्यांनी फिर्यादीच्या बेशुद्ध भावास अमोल यास पाहून आत्याचा नवरा दत्तात्रय देशमुख यांनी चार चाकी गाडीतून उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर येथे दाखल केले असता येथील डॉक्टरांनी तपासणी केली. उपचारापूर्वी अमोल अंगद मृत झाल्याचे सांगितले.




CMYK